बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** बंडगार्डन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0001 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/01/2026 03:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 02/01/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/01/2026
**Time From (वेळेपासून):** 14:20 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/01/2026 **Time (वेळ):** 02:12 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/01/2026 02:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** नविन जिल्हा परिषद,समोरील सार्वजनिक रोडवर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दिपक बाळासो ना◌ीरकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गोतंडी ,ता इंदापुर ,जि पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गोतंडी ,ता इंदापुर ,जि पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9284332596

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामकिशन गंगाराम घ्यार | | | 1. क्वार्टर नं 01 प्राथमिक,आरोग्य केंद्र वाघोली ,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत<br>2. हिंगोली रेल्वे स्टेशनच्या पाठी, सरस्वती नगर,ता हिंगोली जि हिंगोली,बंडगार्डन,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी प्रसाद माणिक लोणारे, वय-51, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9923444998

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि 02/12/2025 रोजी 18.00 वा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तक्रारदार श्री दिपक बाळासो नाझीरकर वय-33, धंदा-नोकरी (आरोग्य सेवक), उपसंचालक कार्यालय, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे रा. गोंतडी, ता.इंदापुर, जि.पुणे हे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. त्यानंतर तक्रारदार यांना आम्ही आमचे कक्षात बसविले व त्यांची तक्रार ऐकुन त्यांचे हस्ताक्षरामध्ये लिहुन घेण्यात आली व त्यांना दिनांक 03/12/2025 रोजी सकाळी 10.00 वा लाप्रवि कार्यालयात हजर राहणेबाबतची सुचना देण्यात आली. श्री. दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी दिनांक 03/12/2025 रोजी आम्हाला सदर कारवाई करीता प्रादेशिक परिवहन विभाग या विभागाचे पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. दिनांक 03/12/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता प्रादेशिक परिवहन विभागाचे श्री. प्रताप शालीग्राम कोळी, पद - कनिष्ठ लिपीक, प्रादेशिक परिवहन विभाग, पुणे रा. डिफेन्स सुंदरम बिल्डींग, वैष्णवी पार्क, फलॅट नं 103, जगताप वस्ती जवळ, वाघोली, पुणे व श्री. पंुडलिक ज्ञानदेव सांगळे, पद - कनिष्ठ लिपीक, प्रादेशिक परिवहन विभाग, पुणे रा. फलॅट नं 102, प्रतिभा निवास, पैलवान कॉलनी, शिवार वस्ती, मारुंजी, ता. मुळशी, जि. पुणे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर झाल्यानंतर आम्ही नमुद पंच यांना आमची ओळख करुन देऊन तक्रारदार व पंचांची एकमेकांसोबत ओळख करुन दिली. नमुद पंच यांना तक्रारदार श्री. दिपक नाझीरकर यांची लोकसेवकाविरुध्द तक्रार असुन आपण सदर कारवाई करीता पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात का? असे विचारले असता दोन्ही पंचानी कारवाई करीता पंच म्हणुन काम करण्यास होकार दिला. नमुद कारवाई करीता पंच क्रं 1 म्हणुन श्री. प्रताप शालीग्राम कोळी, पद - कनिष्ठ लिपीक, प्रादेशिक परिवहन विभाग, पुणे रा. डिफेन्स सुंदरम बिल्डींग, वैष्णवी पार्क, फलॅट नं 103, जगताप वस्ती जवळ, वाघोली, पुणे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. पंुडलिक ज्ञानदेव सांगळे, पद - कनिष्ठ लिपीक, प्रादेशिक परिवहन विभाग, पुणे रा. फलॅट नं 102, प्रतिभा निवास, पैलवान कॉलनी, शिवार वस्ती, मारुंजी, ता. मुळशी, जि. पुणे हे काम पहातील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार नाझीरकर यांना आम्ही दोन्ही पंचासमक्ष त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतली त्यांनी ती कथन केली ती खालीलप्रमाणे.

"मी विनंती तक्रारी अर्ज करतो की, मी वरील प्रमाणे असुन माझी आरोग्य सेवक म्हणुन मार्च 2018 मध्ये हसुर ता.शिरोळ जि. कोल्हापुर याठिकाणी नेमणुक झाली होती. त्याठिकाणी मी सात वर्षे आरोग्य सेवक म्हणुन नोकरी केली. मे 2025 मध्ये माझे वडीलांचा अपघात झाल्याने मी कोल्हापुर परिमंडळ मधुन पुणे परिमंडळ या ठिकाणी अंतरमंडळ बदली करुन मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ येथे दि. 06/06/2025 मध्ये हजर झालो. त्यादिवसापासुन मला मा.उपसंचालक कार्यालयने अदयापपावेतो कोणतीही नियुक्ती दिलेली नसुन अदयाप पावतो मला कोणताही पगार मिळालेला नाही. प्राथमिक आरोग्य कंेद्र लोणी भापकर, ता.बारामती आरोग्य सेवकाचे एक पद रिक्त असल्याने मी दिनांक 18/08/2025 रोेजी नियुक्ती मिळणेबाबत अर्ज केला होता. परंतु त्यंानी नियुक्ती दिली नाही. त्यानंतर प्राथमीक आरोग्य केंद्र सनसर, ता.इंदापुर येथे एक पद रिक्त झाले परंतु त्यांनी मला त्याठिकाणी नियुक्ती दिली नाही. दिनांक 02/11/2025 रोजी मी आमचे वरीष्ठ मा. उपसंचालक श्री. भगवान पवार

यांना समक्ष भेटलो व माझे नियुक्ती बाबत मी त्यांना विनंती केली. त्यावेळेस त्यांनी मला त्यांचे ओळखीचे रामकीशन गियार यांना भेटण्यास सांगीतले व त्यांचा 9881719393 हा मोबाईल नंबर त्यांनी मला दिला. दिनांक 03/11/2025 रोजी मी रामकिशन यांना त्यांचे फोनवर संपर्क केला असता त्यांनी मला नियुक्ती आदेश देण्यासाठी साहेबांशी चर्चा करुन आकडा सांगतो असे सांगीतले. रामकिशन गियार याचे बाबत मी माहीती घेतली असता मला असे समजले की, रामकिशन हा जिल्हा परिषद पुणे येथे आरोग्य सेवक म्हणुन सेवेत असुन श्री.भगवान पवार हे जिल्हा परिषद पुणे येथे जिल्हा आरोग्य अधिकारी असतांना त्यांचे सर्व काम पहात होता व आजही त्यांचे सर्व काम रामकिशन गियार हे पहात आहे. दिनांक 25/11/2025 रोजी विनंती बदलीमधुन पुन्हा बावडा ता.इंदापुर येथे पुन्हा एक पद रिक्त झाले होते. त्यामुळे दिनांक 27/11/2025 रोजी रामकिशन याचा मला फोन आला व त्याने मला बाडवा येथे एक पद रिक्त झाले असुन नियुक्ती पाहीजे असेल तर तिन लाख रुपये दयावे लागतील असे मला संागीतले, त्यावेळी मी त्याला विचार करुन सांगतो असे सांगीतले. मी दि. 28/11/2025 रोजी बावडा ता. इंदापुर जि.पुणे येथे नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे. परंतु अदयापावेतो माझ्या अर्जाचा कोणताही विचार झालेला नसुन मला कोणतीही नियुक्ती देण्यात आलेली नसुन जुन ते आजपावेतो मला पगार ही मिळालेला नाही. त्यामुळे माझी खात्री झाली की, श्री.भगवान पवार, उपसंचालक, आरोग्य विभाग,पुणे मंडळ हे रामकिशन गियार याचे मार्फत तिन लाख रुपये घेतल्यानंतरच मला नियुक्तीपत्र देतील.

तरी रामकिशन गियार याने मागीतलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याने व ती मला देण्याची इच्छा नसल्याने मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे रामकिशन गियार व श्री.भगवान पवार, उपसंचालक, आरोग्य विभाग, पुणे मंडळ यांचे विरुध्द तक्रार देत आहे. माझे व रामकिशन गियार व भगवान पवार यांचेसोबत कोणतेही अर्थिक वाद विवाद नाही. तरी त्यांचे विरुध्द कारवाई होणेस विनंती आहे." अशी तक्रार कथन केली. त्यानंतर तक्रारदार यांनी दि. 02/12/2025 रोजी त्यांचे स्वहस्ताक्षरामध्ये दिलेली तक्रार पंचांना दाखविली सदरची तक्रार आम्ही वाचुन पाहिली असता, तक्रारदार यांनी कथक केलेली व दि. 02/12/2025 रोजी त्यांची त्यांचे स्वहस्ताक्षरामधील दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री करुन दोन्ही पंचांनी सदर तक्रारीवर सहया केल्या. सदर तक्रारीवर समक्ष म्हणुन आम्ही सही केली. लोकसेवक श्री. रामकिशन गियार, आरोग्य सेवक, जिल्हा परिषद व श्री. भगवान पवार, उपसंचालक, आरोग्य विभाग, पुणे मंडळ यांचे कार्यालय, पुणे हे लाप्रवि कार्यालयापासुन साधारणपणे 01 कि.मी. अंतरावर असल्याने पुढील कारवाई लाचलुचपत विभागाच्या कार्यालयातुनच करणेबाबत आम्ही ठरविले. तक्रारदार यांनी आरोग्य सेवक गियार हे त्यांचे मुळगावी मतदानासाठी गेले असल्याचे सांगीतले. त्यावेळी आरोग्यसेवक रामकिशन गियार यांचेकडे फोनवरुन पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचाना व्हॉइस रेकॉर्डरबाबत माहिती देवून मायक्रो एस.डी.कार्डचे सिलबंद पॅकिंग उघडुन आम्हा पंचांना दाखविले असता ते सदरचे मेमरीकार्ड एक सॅनडिस्क कंपनीचे 8 जीबी क्षमतेचे मायक्रो एस. डी.कार्ड असून त्याचे पुढील बाजुस sandisc 8GB Mcro SD HC I 4217 DTJS60C7 BI MADE IN CHINA असे असल्याचे दिसून आले. व सदरचे मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत नसल्याची पंचाची व तक्रारदार यांची खात्री करुन दिली व त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री दिपक बाळासो नाझीरकर यांनी त्यांचे निवेदन व त्यानंतर पंच क्रं 1 म्हणुन श्री. प्रताप शालीग्राम कोळी व पंच क्रं 2 म्हणुन श्री. पंुडलिक ज्ञानदेव सांगळे यांचे पडताळणी कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 12.15 वा. ध्वनीमुद्रीत केले . त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 9284332596 यावरुन लोकसेवक गियार यांचा मो.क्रं. 9881719393 यावर 12.31 व 12.41 वा फोन केला. परंतु लोकसेवक गियार यांनी फोन उचलला नाही. तक्रारदार यांनी लोकसेवक गियार यांचेबाबत माहीती घेतली असता ते मतदानासाठी त्यांचे गावी हिंगोली येथे गेल्याचे तक्रारदार यांनी सांगीतले. त्यामुळे दिनांक 04/12/2025 रोजी पुढील कारवाई करणेबाबत ठरविण्यात आले व तक्रारदार व पंच यांना दिनांक 04/12/2025 रोजी सकाळी 10.00 वा हजर राहणेबाबत सुचना देण्यात आल्या व मेमरी कार्ड सिलबंद केले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 04/12/2025 रोजी तक्रारदार व पंच हे लाप्रवि कार्यालयात सकाळी 10.00 वा हजर झाले. लोकसेवक रामकिशन गियार हे त्यांचे गावावरुन आले किंवा नाही याची खात्री करण्यासाठी आम्ही तक्रारदार यांनी लोकसेवक गियार यांना फोन करण्याचे ठरविले व त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच 1 व 2 यांचे 12.29 वा निवेदन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले व आमचे सुचनेप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 9284332596 यावरुन लोकसेवक गियार यांचा मो.क्रं. 9881719393 यावर 12.51 वा फोन केला असता ते पुणे येथे आले असुन सध्या ते त्यांचे जिल्हा परिषदेच्या ऑफीसमध्ये असल्याचे त्यांनी सांगीतले व तक्रारदार यांना भेटण्यासाठी लोकसेवक गियार यांनी त्यांचे जिल्हा परिषदेच्या ऑफीसजवळ 10 मिनीटात बोलावीले. त्यानंतर आम्ही तात्काळ तक्रारदार व पंच यंाना योग्य त्या सुचना दिल्या व 13.03 व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे शर्टच्या आतमध्ये बनियनला लावुन

दिला व तक्रारदार यांना पंच क्रं 1 कोळी यांचेसह तक्रारदार यांचे दुचाकी क्रं क्रं एमएच 42 एझेड 9204 वरुन रवाना केले. त्यानंतर काहीवेळात तक्रारदार व पंच क्रं 1 कोळी हे लाप्रवि, पुणे कार्यालयातील आमचे कक्षात आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला ती वेळ 13.22 वा.ची होती. त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगीतले की, "मी व पंच क्रं 1 कोळी असे माझे दुचाकी वाहन क्रं क्रं एमएच 42 एझेड 9204 यावरुन जिल्हा परिषद, पुणे येथे गेलो. जिल्हा परिषद ईमारतीजवळ पोहोचल्यानंतर मी लोकसेवक गियार यांना माझ्या मोबाईलवरुन फोन केला त्यावेळी लोकसेवक गियार यांनी माझा कॉल रिसीव्ह करुन त्यांनी मला झेडपीच्या समोरील वडाच्या झालाखालील चहाच्या टपरीजवळ बोलावीले. मी व पंच कोळी असे माझे वाहनावरुन सदर ठिकाणी गेलो. त्यावेळी लोकसेवक गियार हे सदर ठिकाणी उपस्थित होते. त्यावेळी मी पंच कोळी यांना त्यांचेकडे इशारा करत तेच लोकसेवक गियार असलेबाबत सांगीतले. त्यावेळी मी लोकसेवक गियार यांना "बावडयाच्या जागेबाबत काय सरांशी बोलण झाल का?" अशी विचारणा केली असता, लोकसेवक गियार हे मला "हं...." असे म्हणाले. त्यावर मी लोकसेवक गियार यांना "करा की तेवढ, ते प्राथमीक आरोग्य केंद्र बावडा, ते मला टाकलेल" असे बोललो. त्यावर लोकसेवक गियार हे मला "ते सांगीतलेल, तुम्हाला सांगीतल ना ते, पेमेंटचच बोलतात मला ते" असे म्हणाले. त्यावेळी मी लोकसेवक गियार यांना "करतो ना पेमेंट, गाठ घालुन दया सरांशी (लोकसेवक भगवान पवार यंाचेबाबत) अन पेमेंट ते चुलत्यांना मी बोलवुन घेतलय, (पंचांकडे ईशारा करत) आज तेवढी ऑर्डर करा की प्लीज." असे म्हणालो. त्यानंतर पुन्हा आमचेमध्ये कामासंदर्भात सुरु असताना मी लोकसेवक गियार यांना "किती म्हणताय ते?" अशी विचारणा केली. त्यावर लोकसेवक गियार हे मला "तुम्हाला सांगीतले की, तिन सांगीतले आता त्यानं" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना "तिन लाख" असे म्हणालो व "मी करतो काहीतरी नियोजन" असे बोललो. त्यावर लोकसेवक गियार हे मला "हो.. हो..." असे बोललो. त्यावेळी मी त्यांना " फक्त आज ऑर्डर झाली पाहीजे तेवढ प्लीज, बघा" असे म्हणालो. त्यावर ते मला "हो" म्हणाले. त्यानंतर मी पंच कोळी यांना सोबत घेऊन माझ्या दुचाकीवरुन लाप्रवि, पुणे कार्यायलात परत आलो. अशी हकिकत दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली. सदरबाबत आम्ही पंच क्रं 1 यांना विचारणा केली असता त्यांनी वरीलप्रमाणे हकीकत सांगुन तक्रारदार व लोकसेवक गियार यांचेमधील झालेले संभाषण माझे समक्ष झाले असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन एैकले असता ते तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी सांगीतलेली हकीकतप्रमाणे खरे असल्याची खात्री केली.

एकंदरीत पंचांसमक्ष लोकसेवक रामकिशन गियार यांचेकडे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक रामकिशन गियार यांनी श्री भगवान पवार , उपसंचालक, आरोग्य विभाग, पुणे मंडळ यांचेकडुन तक्रारदार यांना प्राथमीक आरोग्य केंद्र, बावडा, ता.इंदापुर येथे रिक्त असलेल्या आरोग्य सेवकाच्या पदी नियुक्ती देणेकरीता श्री भगवान पवार , उपसंचालक, आरोग्य विभाग, पुणे मंडळ यांचेकरीता तिन लाख रुपयांची लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले असुन लोकसेवक रामकिशन गियार यांनी तक्रारदार यांना दुपारी तिन नंतर फोन करुन लोकसेवक भगवान पवार यांची भेट घालुन देणार अगर कसे? याबाबत कळवितो, असे सांगीतल्याने लोकसेवक रामकिशन गियार यांचा फोन आल्यानंतर पुढील कारवाई करणेबाबत ठरविण्यात आले. दुपारी 15.30 वा. पर्यंत लोकसेवक गियार यांनी फोन न केल्याने आम्ही तक्रारदार यांना त्यांचा मो.क्रं. 9284332596 यावरुन लोकसेवक गियार यांचा मो.क्रं. 9881719393 यावर फोन करणेस सांगीतला त्यावेळी तक्रारदार यांना लोकसेवक गियार हे "हो.. फोन केला होता.. साहेब थोड बाहेर ए... याला संचालक 1 ला गेलेत, विश्रांतवाडीला" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवक गियार यांना "बर, ठिकय मंग आता, कस करायच?" अशी विचारणा केली असता, लोकसेवक गियार हे तक्रारदार यांना "तुमच मला काय म्हणायच पेमेंटच किती झालय रेडी?" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे लोकसेवक गियार यांना "पेमेंट रेडी केलय मी दिड" असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक गियार हे तक्रारदार यांना "दोनच करा, आणि एक मला सोमवारी दया वाटल्यास" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे लोकसेवक गियार यांना "ठिकय चालतय, ओके" असे म्हणाले व "अं.... साहेबांची भेट होईल ना, ऑर्डर पाहिजेत पण आज आ..." अशी विचारणा केली. त्यावर लोकसेवक गियार हे तक्रारदार यांना "साहेबाची भेट, साहेब तस भेटणार नाही बर का? आपल्याला ऑर्डर भेटली बस झाल बाकी काय करायच" असे म्हणाले. त्यानंतर लोकसेवक गियार यांनी पुन्हा तक्रारदार यांना लाच रक्कम रेडी झाली की सांगा असे म्हणुन फोन कट केला. सदरचा कॉल रेकॉर्डवर घेण्यात आलेला आहे. लोकसेवक रामकिशन गियार हे लोकसेवक भगवान पवार यांची भेट घालुन देण्यास टाळाटाळ करीत असल्याने दिनांक 05/12/2025 रोजी लोकसेवक भगवान पवार, उपसंचालक, आरोग्य विभाग यांचे कार्यालयात जावुन समक्ष पडतळणी करण्याचे आम्ही ठरविले. त्यानंतर आम्ही सदरचे मेमरी कार्ड सिलबंद करुन तक्रारदार व पंच यांना दिनांक 05/12/025 रोजी सकाळी 10.00 वाजता हजर राहणेबाबत सुचना दिल्या.

सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 05/12/2025 रोजी तक्रारदार व पंच सकाळी 10.00 वा लाप्रवि कार्यालयात हजर झाले. लोकसेवक भगवान पवार, उपसंचालक, आरोग्य विभाग, पुणे मंडळ यांचेकडे समक्ष पडताळणी करण्यासाठी प्रथम तक्रारदार श्री दिपक बाळासो नाझीरकर पंच क्रं 1 म्हणुन श्री. प्रताप शालीग्राम कोळी व पंच क्रं 2 म्हणुन श्री. पंुडलिक ज्ञानदेव सांगळे यांचे पडताळणी कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 10.59 वा. ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे शर्टच्या आतमध्ये बनियनला लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्रं 1 यांचेसह दुचाकी क्रं एमएच 42 एझेड 9204 वरुन 11.27 वा. रवाना केले. त्यानंतर काहीवेळात तक्रारदार व पंच क्रं 1 कोळी हे लाप्रवि, पुणे हे आमच्या कक्षात आले. आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला ती वेळ 12.59 वा.ची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगीतले की, मी व पंच कोळी उपसंचालक कार्यालय, आरोग्य विभाग, पुणे मंडळ येथे गेलो. सदर ठिकाणी लोकसेवक भगवान पवार यांचे केबीनच्या बाहेर बसुन राहिलो. कांहीवेळाने लोकसेवक भगवान पवार हे त्यांचे केबीनच्या बाहेर आल्याने मी व पंच त्यांचे मागोमाग गेलो. त्यावेळी मी त्यांना "साहेब नमस्कार" असे बोललो असता ते मला "बस की तिथ, माझ्या काय मागण येणारेस, गाडीतुन येतोय, फिरायला आल्यावाणी" असे चिडुन बोलुन निघुन गेले. त्यानंतर मी त्यांचे कार्यालयातील शिपाई यांना साहेब परत येण्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी आता साहेब येणार नसल्याचे सांगीतल्याने मी व पंच क्रं 1 सदर ठिकाणाहुन निघुन माझ्या दुचाकी वाहनाने लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आलो. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष पडताळणी कारवाई दरम्यानचे व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता, त्यामध्येही तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी सांगीतलेल्या हकिकतीप्रमाणेच संभाषण मिळुन आले. त्यानंतर आम्ही पथक कार्यालयात थांबुन राहीलो. दुपारी 02. 35 वा. तक्रारदार यांचे मोबाईलवर लोकसेवक गियार याचा फोन येत असल्याचे सांगीतले परंतु फोन कट झाला, म्हण्ुन आम्ही तक्रारदार यंाना लोकसेवक गियार यांना फोन करण्यात सांगीतले, त्यानुसार तक्रारदार नाझीरकर यांनी 14.38 वा. लोकसेवक गियार यांना फोन केला असता त्यांनी पुन्हा लाचेच्या रकमेबाबत विचारणा करुन "काय, झाल का ओ तुमच सगळ? काय.. त्यांच मला फोन आलता साहेबांचा, म्हणल काय झाल" असे बोलले परंतु तक्रारदार यांनी काही पैसे वडीलांच्या औषधासाठी खर्च झाले असुन पैश्याची अॅडजेस्टमेंट झाली नसल्याचे व पैसे अॅडजेस्ट झाल्यानंतर फोन करतो असे कारण सांगीतले. सदरचा फोन रेकॉर्डवर घेण्यात आलेला आहे. तक्रारदार नाझीरकर व लोकसेवक गियार यांचेमध्ये झालेल्या फोनवरील संभाषणावरुन लोकसेवक गियार हे तक्रारदार यांना लाच रक्कम घेऊन बोलावीत आहे. परंतु दिनांक 06/12/2025 व 07/12/2025 रोजी कार्यालयाला सुटटी असल्याने व लोकसेवक भगवान पवार, उपसंचालक , आरोग्य विभाग, पुणे मंडळ यांचेकडे पडताळणी करणे आवश्यक असल्याने आम्ही दिनांक 08/12/025 रोजी पडताळणी करण्याचे ठरविले. लोकसेवक गियार हे लाच रक्कम घेवुन बोलावित असल्याने आम्ही तक्रारदार यांना पुन्हा लोकसेवक गियार यांना फोन करुन लाच रक्कम दिनांक 08/12/2025 रोजी घेवुन येत असल्याबाबत फोन करुन सांगण्यास सांगीतले म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवक गियार यंना 14.59 वा फोन केला व पुन्हा लोकसेवक भगवान पवार यांची भेट घालुन देणेबाबत विनंती केली असता लोकसेवक गियार यांनी "पहिली आपली ऑर्डर काढुन घेऊ, नंतर आपण निवांत भेटु साहेबाला, मी साहेबाला जेवायला आणतो तुमच्याकड, तो विषय वेगळा झाला" व "सोमवारी..... तुम्हाला मी भेटीच नाही सांगु शकत काही" परंतु "तुमच तुम्हाला ऑर्डर, करुन घेतो" असे सांगुन लोकसेवक गियार यांनी सोमवारी लाच रक्कम घेवुन येण्याबाबत होकार दिला. सदरचा फोन रेकॉर्डवर घेण्यात आलेला आहे. त्यामुळे आम्ही दिनांक 08/12/2025 रोजी लोकसेवक भगवान पवार यांचेकडे पडताळणी करण्याचे ठरविले व तक्रारदार व पंच यांना दिनांक 08/12/2025 रोजी सकाळी 10.00 वा हजर राहण्याच्या सुचना दिल्या. सदरचे सिमकार्ड सिलबंद केले. याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 08/12/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता पंच व सापळा पथक हजर झाले. तक्रारदार हे 11.30 वा कार्यालयात हजर झाले. त्यानंतर आम्ही सदर पडताळीणी कारवाई करीता नविन मेमरी कार्ड वापरण्याचे ठरवुन ते मेमरी कार्ड पंचांना दाखविण्यात आले असता सदरचे नविन सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी. कार्ड असून त्याचे पुढील बाजुस च्हुदक़्त्भ्त्त् 32 क्रए ग्त्ड़्द्धदृ च्क् क्तक् क्ष् 5334ज्र्ज्2415ज्र्ज् ग्ऋक़्क क्ष् क्तक्ष्त्रऋ असे असल्याचे दिसून आले. त्यानंतर लोकसेवक भगवान पवार यांचेकडे पडताळणी कामी आम्ही प्रथम तक्रारदार व पंच क्रं 1 म्हणुन श्री. प्रताप शालीग्राम कोळी व पंच क्रं 2 म्हणुन श्री. पंुडलिक ज्ञानदेव सांगळे यांचे पडताळणी कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 12.21 वा. ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे शर्टच्या आतमध्ये बनियनला लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्रं 1

यांचेसह दुचाकी क्रं एमएच 42 एझेड 9204 वरुन रवाना केले ती वेळ 12.35 वा. ची होती. त्यानंतर काहीवेळात तक्रारदार व पंच क्रं 1 कोळी हे लाप्रवि, पुणे कार्यालयातील आमचे कक्षात आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला ती वेळ 15.44 वा.ची होती. त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगीतले की, मी व पंच कोळी माझ्या दुचाकी वाहनावरुन उपसंचालक कार्यालय, आरोग्य विभाग, पुणे मंडळ कार्यालयात गेलो. काहीवेळाने लोकसेवक भगवान पवार हे त्यांचे केबीनमध्ये आले. त्यानंतर तेथील शिपाई यांनी मला, पंच यांना बाहेर थांबवा, असे सांगीतले म्हण्ुन पंच कॅबीनच्या बाहेर थांबले. काहीवेळ मी थांबुन त्यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी लोकसेवक भगवान पवार हे मला "थांब जरा बाहेर" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना "तुम्ही म्हटल्याप्रमाणे सर, केलीय मी तयारी" असे म्हणालो. त्यावर ते मला "नाय नाय, मग काय डोक्यावर येऊन बसतोय का माझ्या?" असे म्हणाले. व मला "थांब ना दोन मिनीट" असे चिडुन म्हणाल्याने मी त्यांचे केबीनच्या बाहेर पंचाजवळ येऊन बसलो. त्यानंतर काहीवेळाने लोकसेवक भगवान पवार हे त्यांचे केबीनच्या बाहेर निघुन लिफटकडे गेल्याने मी ही त्यांचेमागोमाग लिफटकडे गेलो, लोकसेवक भगवान पवार हे लिफटमध्ये गेल्याने मी ही त्यांचे पाठोपाठ लिफटमध्ये गेलो. त्यानंतर लिफटमध्ये मी लोकसेवक भगवान पवार यांना "परवा रामकिशनची भेट झाली, त्याप्रमाणे..." असे म्हणालो त्यावर लोकसेवक भगवान पवार हे मला "मला काहीही बोलु नकोस लिफटमध्ये" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "ऑर्डरच" असे म्हणालो. असता त्यांनी मला "मला तुला देतो कुठ दयायच ते, जा तु , माझा अधिकार ए ना, अस पाठीमाग लागुन लिफटमध्ये तु माझ्याशी बोलतोस" असे म्हणाले. व मला "हा ठिकए; मी देतो कुठ, जा तुला ऑर्डर मिळेल" असे म्हणाले. त्यावेळी लिफट ग्राउंड फलोअरला आल्याने लोकसेवक भगवान पवार लिफटमधुन बाहेर निघुन त्यांचे वाहनात बसुन निघुन गेले. त्यानंतर सदर ठिकाणाहुन पंच क्रं 1 कोळी यांना सोबत घेऊन माझे दुचाकी वाहनावरुन लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आलो. अशी हकिकत आम्हा दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन एेकले असता ते तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी सांगीतलेली हकीकतप्रमाणे खरे असल्याची खात्री केली. त्याबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. दि. 08/12/2025 रोजीच्या लोकसेवक भगवान पवार यांचेकडे केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक भगवान पवार हे तक्रारदार यांचेसोबत लाचेसंदर्भात चर्चा करीत नसल्याचे निष्पन्न झाले होते. व लोकसेवक गियार यांचेसोबत झालेल्या संभाषणामध्ये त्यांनी दि. 09/12/2025 रोजी लाच रक्कम घेऊन बोलावीले असल्याचे निष्पन्न झालेने दि. 09/12/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार यांना लाच रक्कमेची तजबीज करणेबाबत सुचना देवुन आम्ही तक्रारदार व पंचांना दि. 09/12/2025 रोजी सकाळी 09.30 वा हजर राहणेबाबत सुचना देवुन मेमरी कार्ड सिलबंद केले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 09/12/2025 रोजी सकाळी 09.30 वा तक्रारदार व पंच व सापळा पथक कार्यालयात हजर झाले व सापळा कारवाई करण्याचे आम्ही ठरविले. सापळा कारवाई करण्यापुर्वी आम्ही तक्रारदार व दोन्ही पंच यांचे 10.26 वा व्हिडीओ चित्रण करुन निवेदन घेतले. व त्यानंतर लोकसेवक रामकिशन गियार यांना फोन करुन लाच रक्कम कोठे घेवुन बोलाविणार याची खात्री करण्यासाठी आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक गियार यांना फोन करण्यास सांगीतले. तक्रारदार यांना त्यांचा मो.क्रं. 9284332596 यावरुन लोकसेवक गियार यांचा मो.क्रं. 9881719393 यावर 10.56 वा फोन केला असता गियार यांनी "मी करतो ना थोडयावेळात फोन" असे बोलुन फोन कट केला. त्यानंतर आम्ही संपुर्ण सापळा पथक लोकसेवक गियार यांच्या फोनची वाट पहात थांबुन राहीलो. लोकसेवक गियार यांचा फोन न आल्याने आम्ही पुन्हा दुपारी 13.59 व सायंकाळी 17.54 वा फोन केला परंतु लोकसेवक गियार यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने आम्ही सापळा कारवाई दिनांक 10/12/2025 रोजी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आम्ही मेमरी कार्ड सिलबंद करुन तक्रारदार व सापळा पथकास दिनांक 10/12/2025 रोजी सकाळी 09.30 वा लाप्रवि कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिल्या.

दिनांक 10/12/2025 रोजी सापळा पथकामध्ये पोशि आडके यांचा सामावेश करण्यात आला. सापळा पथक व तक्रारदार हे सकाळी 09.30 वा लाप्रवि कार्यालयात हजर झाले. त्यावेळी त्यावेळी तक्रारदार यांनी पंचासमक्ष सांगीतले की, आज सकाळी 08.15 वा मी लोकसेवक गियार यांना फोन केला असता त्यांनी आज सकाळी 11.30 वा जिल्हापरिषद कार्यालयाचे परीसरात भेटण्यास बोलाविले आहे. त्यामुळे सापळा कारवाई करण्याचे आम्ही ठरविले व पोशि विकास आडके यांच्या ताब्यात व्हिडीओ कॅमेरा देऊन सापळा कारवाईच्या निवेदणाचे व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबत पोशि आडके यांना सुचना दिली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये प्रथम तक्रारदार श्री दिपक बाळासो नाझीरकर यांनी त्यांचे निवेदन व त्यानंतर आम्ही पंच अनुक्रमे पंच क्रं 1 म्हणुन श्री. प्रताप शालीग्राम कोळी व पंच क्रं 2 म्हणुन श्री. पंुडलिक ज्ञानदेव सांगळे यांचे सापळा कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील

मेमरीकार्ड मध्ये 10.42 वा. व्हिडीओ चित्रण करुन निवेदन केले. तक्रारदार नाझीरकर यांना आम्ही पंचांसमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारले असता, त्यांनी आमचे समोर लोकसेवकाने मागणी केलेल्या 03 लाख रूपये लाच रकमेपैकी 80,000/-(भारतीय चलनातील रु.500/- दराच्या एकुण 160 नोटा) इतकी रक्कम काढून सदरची रक्कम ही लाचेच्या रक्कमे स्वरुपात वापरावयाची असून ती त्यांचे वैयक्तिक बचतीतुन आणली असल्याचे तक्रारदार नाझीरकर यांनी सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांचेकडे लोकसेवक यांनी मागणी केल्याप्रमाणे संपुर्ण रक्कम नसल्याने सदर रकमेमध्ये खेळण्यामधील 500/- रुपये दराच्या एकुण 440 बनावट नोटा ठेवण्याचे आम्ही ठरविले. आमचे सुचनेवरून पोशि आडके यांनी लाचेकामी वापरण्यात येणा-या ख-या रक्कमेच्या चलनी नोटांचे नंबर एका को-या कागदावर पंच क्र.2 श्री सांगळे यांचे मदतीने लिहून घेवून त्यावर आम्ही व पंचांनी समक्ष म्हणून सहया केल्या. सापळापुर्व कारवाई लाप्रवि, पुणे कार्यालयामधुनच करण्याचे ठरविल्याने लाच रकमेस अँथ्रासीन पावडर लावणेकामी लाप्रवि, पुणे कार्यालयातील हजर असलेल्या मपोहवा 8060 साका यांना आम्ही तात्पुरते सापळा पथकामध्ये सामील करुन घेतले व त्यानंतर मपोहवा/साका यांनी कार्यालयात दोन्ही पंच साक्षीदार आणि तक्रारदार यांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर मपोहवा/साका यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या 160 भारतीय चलनी नोटा, 500 रुपये दराच्या खेळण्यातील बनावट नोटा व वर्तमानपत्र, आकाशी रंगाची पिशवी एका कागदावर ठेवून त्या नोटांच्या दोंन्ही बाजुस, वर्तमानपत्राच्या दोन्ही बाजुस व पिशवीच्या बंदाला व दोन्ही बाजुस कापसाच्या बोळयाने क्रमा-क्रमाने अॅथ्रासिन पावडर लावली. व त्यानंतर लाप्रवि कार्यालयातील आमचे केबीनमध्ये कृत्रीम अंधार केला असता मपोहवा/साका यांचे हातातील नोटांवर, वर्तमानपत्रावर व आकाशी रंगाच्या पिशवीवर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या सर्व नोटांवर, वर्तमानपत्रावर व आकाशी रंगाच्या पिशवीस दोन्ही बाजुस अॅंथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. तशीच चकाकी मपोहवा/साका यांच्या दोन्ही हातंाच्या बोंटावर देखील दिसुन आली. मपोहवा/साका यांनी त्या नोटांचे रबराने 06 बंडल करुन सदरचे बंडल वर्तमानपत्रामध्ये गुंडाळुन त्यास वरुन रबर लावले व सदरची लाच रक्कम आकाशी रंगाच्या पिशवीमध्ये ठेवुन तक्रारदार श्री. दिपक नाझीरकर यांच्या दुचाकी होंडा युनीकॉर्न वाहन क्रं एमएच 42 एजे 9204 च्या डिक्कीमध्ये ठेवली. त्यानंतर मपोहवा/साका यांना ठरल्याप्रमाणे पथकातुन वगळण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवुन लोकसेवक गियार यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे अंगातील जर्कीन काढण्याचा इशारा देण्यास सांगीतले व त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार यांचे शर्टच्या आतमधील बनियनला लावुन तक्रारदार व पंच क्रं 1 कोळी यांना तक्रारदार यांचे दुचाकी होंडा युनीकॉर्न वाहन क्रं एमएच 42 एजे 9204 यावरुन जिल्हा परिषद, पुणे कार्यालयाच्या दिशेने 11.26 वा रवाना केले व त्यानंतर आम्ही व सापळा पथकातील अंमलदार व पंच क्र.2 असे शासकीय वाहन क्र.एमएच 12 आरवाय 7271 यामधुन जिल्हा परिषद, पुणे कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. शासकीय वाहन हॉटेल ब्लु नाईलच्या बाजुला पार्क करुन चालक सोडून सर्व वाहनातुन उतरून पायी चालत इराणी हॉटेल परिसरामध्ये कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबुन राहिलो. त्यानंतर सदर ठिकाणी तक्रारदार व पंच दुचाकी त्याठिकाणी वाहनावरुन आले व काहीवेळातच तक्रारदार हे कोणताही इशारा न करता त्यांचे दुचाकी वाहनावरुन पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन सदर ठिकाणाहुन लाप्रवि कार्यालयाकडे निघाले. आम्ही संपुर्ण पथक व पंच सदर ठिकाणाहुन लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आले. परत आल्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. ती वेळ 11.40 वा ची होती. आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता, तक्रारदार यांनी आम्हा दोन्ही पंचांसमक्ष सांगीतले की, जिल्हा परिषद कार्यालयाच्या आवारात पोहचल्यानंतर मी माझ्या मोबाईलवरुन लोकसेवक गियार यांच्या मोबाईलवर फोन केला असता त्यांनी मला "मी आता औंधला आहे, दोन-अडीच वाजता भेटु झेडपी ला" असे म्हणाले. म्हणुन आपण दिलेल्या सुचनेप्रमाणे लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आलो. अशी हकिकत आम्हा दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली. सापळा कारवाई दरम्यानचे ध्वनिमुद्रीत संभाषण आम्ही पंचांसमक्ष फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता, त्यामध्ये तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी सांगीतलेल्या हकिकतीप्रमाणेच संभाषण मिळुन आले. त्यानंतर आम्ही दुपारी 14.00 वाजेनंतर सापळा कारवाई करण्याचे ठरवुन संपुर्ण सापळा पथक लाप्रवि कार्यालयात थांबुन राहीलो. त्यावेळी तक्रारदार हे चहा पिऊन येतो असे सांगुन आमचे कक्षातुन आम्हा पंचांसमक्ष निघुन गेले. त्यानंतर काहीवेळात तक्रारदार हे आमचे कक्षात आले. त्यावेळी तक्रारदार यांनी आम्हास पंचांसमक्ष सांगीतले की, चहा पिण्यास गेल्याच्या दरम्यान "माझा मित्र नामे सचिन खारमाटे यांनी मला त्यांचा मो.क्रं. 8888144390 यावरुन मला फोन करुन सांगीतले की, तुमचे मित्र श्री. महेश पवार, आरोग्य सेवक, लाखेवाडी, ता इंदापुर, जि. पुणे हे माझ्या दुकानात आले होते, त्यावेळी त्यांनी मला तुम्हाला फोन करायला सांगुन त्यांनी मला महेश पवार यांचा मो.क्रं. 9860331846 व्हॉटसअॅप केला. त्यानंतर मी महेश पवार यांना फोन केला असता, त्यांनी मला सांगीतले की,

माझ्या ओळखीचे एक व्यक्ती हे तुमची नियुक्तीची ऑर्डर काढुन देतील, तुम्ही त्यांना जाऊन भेटा, त्यावेळी मी त्यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी नाव सांगण्यास नकार दिला. त्यानंतर त्यांनी मला पुणे स्टेशन येथे दग्र्याजवळ थांबण्यास सांगुन तुम्हाला भेटण्यास एक व्यक्ती येईल त्याच्यासोबत नियुक्ती आदेशाबाबत बोलुन घ्या असे स◌ांगीतले." त्यावेळी तक्रारदार यांनी सदरचा व्यक्ती लोकसेवक भगवान पवार यांचा माणुस असु शकतो, त्यामुळे त्याच्याकडे पडताळणी करण्याची विनंती पंचांसमक्ष आम्हाला केली. म्हणुन आम्ही नमुद इसमाकडे पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आम्ही मपोहवा साका यांना तक्रारदार यांचे वाहनातील लाच रक्कम काढुन घेऊन सुरक्षीतरित्या एका खाकी लिफाम्यामध्ये ठेवण्यास सांगीतली.

त्यानंतर तक्रारदार यांचा मित्र महेश पवार यांनी भेटण्यास सांगीतलेल्या इसमाकडे पडताळणी कारवाईच्या अनुशंगाने प्रथम तक्रारदार श्री दिपक बाळासो नाझीरकर व दोन्ही पंचांचे निवेदन 13.00 वा. ध्वनीमुद्रीत केले. व तक्रारदार यांना पंच क्रं 1 यांचेसह दुचाकी क्रं एमएच 42 एझेड 9204 वरुन पुणे स्टेशन येथील दग्र्याजवळ रवाना केले ती वेळ 13.10 वा. ची होती. त्यानंतर काहीवेळात तक्रारदार व पंच क्रं 1 कोळी हे आमचे कक्षात आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला ती वेळ 13.55 वा.ची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगीतले की, मी व पंच कोळी माझ्या दुचाकी वाहनावरुन पुणे रेल्वे स्टेशन येथील दग्र्याजवळ गेलो. काहिवेळाने माझ्याजवळ एक ईसम आले. त्यांनी मला महेशने पाठवले आहे का अशी विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना होकार दिल्यानंतर, त्यांनी माझ्याकडे पंचांबाबत विचारणा केली असता, मी त्यांना ते माझे काका असलेबाबत सांगीतले. त्यानंतर मी त्यांना त्यांचे नाव, त्यांचे कार्यालय व पदाबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला त्यांचे नाव व इतर माहिती देण्याबाबत नकार दिला. त्यानंतर आमचेमध्ये माझे नियुक्ती आदेशाबाबत चर्चा झाली परंतु नमुद इसमाने माझ्याकडे कोणत्याही प्रकारच्या लाचेची मागणी केली नाही. मी नमुद इसमास वारंवार त्यांचे नाव व ईतर माहिती विचारण्याचा प्रयत्न केला परंतु सदर इसमाने त्यांचे नाव व इतर माहिती देण्यास नकार दिला म्हणुन मी सदर ठिकाणाहुन निघुन पंच क्रं 1 कोळी यांना सोबत घेऊन माझ्या दुचाकी वाहनाने लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आलो. अशी हकिकत पंच क्रं 2 यांचे समक्ष सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन एकले असता ते तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी सांगीतलेली हकीकतप्रमाणे खरे असल्याची खात्री केली.

लोकसेवक गियार यांनी सापळा परत कारवाई दरम्यान तक्रारदार यांना दुपारी दोन – अडीच वाजता भेटु असे सांगीतल्याने, आम्ही पुन्हा सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरविले. आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी 15.07 वा त्यांचा मो.क्रं. 9284332596 यावरुन लोकसेवक गियार यांचा मो.क्रं. 9881719393 यावर फोन केला असता लोकसेवक गियार यांनी तक्रारदार यांना "जुनी झेडपी जवळ, 15-20 मिनीटात या, मी पोहोचतो तिथ, मी आता संचेती हॉस्पीटल जवळ आहे" असे सांगीतले. आम्ही तात्काळ सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरविले व मपोहवा साका यांना खाकी लिफाफयातील लाच रकमेसह बोलावुन घेऊन तक्रारदार व दोन्ही पंचाना पिशवीस व वर्तमान पत्रास अं◌ॅथ्रासिन पावडरची असल्याची खात्री करुन देवुन सदरची लाच रक्कम मपोहवा साका यांना तक्रारदार यांचे दुचाकी होंडा युनीकॉर्न वाहन क्रं एमएच 42 एजे 9204 च्या डिक्कीमध्ये ठेवण्यास सांगीतले. व त्यांना सापळा कारवाई मधुन वगळण्यात आले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार यांचे शर्टच्या आतमधील बनियनला लावुन तक्रारदार व पंच क्र.1 यांना 15.24 वा तक्रारदार यांचे दुचाकी होंडा युनीकॉर्न वाहन क्रं एमएच 42 एजे 9204 यावरुन जुनी जिल्हा परिषद, पुणे कार्यालयाच्या दिशेने रवाना केले. आम्ही , सापळा पथकातील अंमलदार व पंच क्र.2 असे शासकीय वाहन क्र.एमएच 12 आरवाय 7271 यामधुन जुन्या जिल्हा परिषद, पुणे कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो व शासकीय वाहन सुदामाचे पोहे या हॉटेलसमोर पार्क करुन थांबुन चालक सोडून सर्व वाहनातुन उतरून पायी चालत जुन्या जिल्हा परिषदेच्या आवारात सापळा लावुन थांबुन राहिलो. त्यानंतर काहीवेळात सदर ठिकाणी तक्रारदार व पंच कं◌्र 01 असे दुचाकी वाहनावरुन आले. तक्रारदार यांनी त्यांचे वाहन पार्क करुन जुन्या झेडपी कार्यालयाच्या मुख्य प्रेवशव्दाराजवळ थांबुन राहिले. काहीवेळाने तक्रारदार यांच्याजवळ दोन इसम आले. ते दोन इसम, तक्रारदार व पंच क्रं 1 तेथील निरा विक्री केंद्रामध्ये गेले. निरा पिल्यानंतर ते सर्वजण सदर ठिकाणाहुन निघुन जुन्या जिल्हा परिषद कार्यालयाच्या प्रवेशव्दाराजवळ गेले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी कोणताही इशारा न करता सदर ठिकाणाहुन त्यांचे दुचाकी वाहनावरुन निघाले. त्यानंतर संपुर्ण पथक व पंच सदर ठिकाणाहुन निघुन शासकीय वाहनात बसले व ठरल्याप्रमाणे लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आले. शासकीय वाहनाच्या मागोमाग तक्रारदार व पंच क्रं 1 कोळी हे लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. ती वेळ 15.55 वा ची होती. त्यानंतर तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता, तक्रारदार यांनी

आम्हा दोन्ही पंचांसमक्ष सांगीतले की, मी व पंच क्रं 1 कोळी असे माझ्या दुचाकी वाहनावरुन जुन्या जिल्हा परिषद कार्यालयासमोर माझे दुचाकी वाहन पार्क केले. त्यानंतर मी माझ्या मोबाईलवरुन लोकसेवक गियार यांच्या मोबाईलवर फोन करुन माझ्या मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी लोकसेवक गियार यांनी पाच मिनिटात आलो असे म्हणालो. थोडयाचवेळात लोकसेवक गियार हे त्यांचे वाहनामधुन त्याठिकाणी मला येताना दिसले. त्यांनी त्यांचे वाहन जुनी जिल्हा परिषदेच्या पार्कींगमध्ये पार्क करुन बाहेर आले. त्यावेळी त्यांचेसोबत एक इसम होता. त्यानंतर मी, पंच, लोकसेवक गियार व त्यांचेसोबत असलेला इसम तिथेच असलेल्या निरा केंद्रामध्ये निरा पिण्यासाठी गेलो. त्यावेळी लोकसेवक गियार यांनी मला, पंचांना उद्देशुन "हे बंधु कुठे असतात कामाला?" अशी विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना "चुलते आहे हे, जेजुरीचे" असे म्हणालो. त्यानंतर मी त्यांना "भगवाना सरांना तुम्ही बोला, पगार सहा महिण्याचा महत्वाचा आहे" असे म्हणालो. त्यावर लोकसेवक गियार हे मला "नाही झाल ते, सगळ बोलण झालय" त्यावर मी त्यांना "आजच्या आज होवुन जाईल ना ऑर्डर आपली" अशी विचारणा केली असता, त्यांनी मला "ऑर्डर तुम्हाला उदया संध्याकाळी मिळेल" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "पगाराची एनओसी?" असे विचारले असता लोकसेवक गियार हे मला "ते पण, तुम्ही तिथ जॉईन होणार, अन इकडुन तिकड पगार काढायचा हं.." असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा आमचेमध्ये माझ्या प्रलंबीत कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर आम्ही निरा केंद्रामधुन निरा पिऊन निघालो. त्यावेळी लोकसेवक गियार हे जुनी जिल्हा परिषद कार्यालयाच्या गेटजवळ गेले असता, मी व पंच त्यांचेसोबत गेलो. त्यावेळी लोकसेवक गियार हे मला "हाताच्या बोटाने पैशांचा इशारा करत, येतो तासाभरात" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "फोन करता का?" अशी विचारणा केली. त्यावर लोकसेवक गियार हे मला "मी फोन करतो, काय अडचण नाय?" असे म्हणाले व ते जुन्या जिल्हा परिषद कार्यालयामध्ये निघुन गेले. त्यानंतर मी पंच कोळी यांना सोबत घेऊन माझ्या दुचाकी वाहनावरुन लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आलो अशी हकिकत आम्हा दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली. आम्ही सापळा पथक लोकसेवक गियार यांचे फोन ची वाट पहात कार्यालयात थांबुन राहीलो. सायंकाळी 17.55 वा. पर्यंत तक्रारदार यांना लोकसेवक गियार यांचा फोन कॉल न आलेने सापळा कारवाईच्या अनुशंगाने आम्ही तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 9284332596 यावरुन लोकसेवक गियार यांचा मो.क्रं. 9881719393 यावर फोन केला त्यावेळी लोकसेवक गियार यांनी तक्रारदार यांचा फोन रिसीव्ह करुन तक्रारदार यांना "मी साता-याला निघालो, आता कात्रजच्या पुढए पार" असे म्हणुन "मी बोलतो तुम्हाला सकाळी" असे म्हणुन फोन कट केला. लोकसेवक गियार हे सकाळी खात्रीशिर भेटणार आहे अगर कसे? म्हणुन आम्ही पुन्हा तक्रारदार यांना गियार यांना फोन करण्यास सांगीतले त्यावेळी लोकसेवक गियार यांनी फोनवर "तुम्ही थांबा ना सकाळी भेटु आपण ठिकए" असे फोनवर बोलुन फोन कट केला.

एकंदरीत सापळा कारवाईच्या अनुशंगाने तक्रारदार नाझीरकर व लोकसेवक गियार यांचेमध्ये झालेल्या संभाषणावरुन लोकसेवक गियार यांनी तक्रारदार यांना उदया दि. 11/12/2025 रोजी बोलावील्याचे निष्पन्न झालेने आज रोजीची सापळा कारवाई स्थगित करुन व लाच रक्कम मपोहवा साका यांचेकडुन गाडीचे डिक्क्ीतुन काढुन सुरक्षीत एका खाकी लिफाफयात सुरक्षीत ठेवली व त्यानंतर मेमरी कार्ड सिलबंद करण्यात आले व सापळा पथकास सकाळी 10.00 वा हजर राहणेबाबत आम्ही सुचना दिल्या. सदरबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 11/12/2025 रोजी संपुर्ण सापळा पथक हे सकाळी 10.00 वा कार्यालयात हजर झाले. सदरवेळी विकास आडके यांचे ऐवजी नव्याने पथकामध्ये पोशि रवि दिवेकर यांना सामील करण्यात आले. लोकसेवक गियार यांना संशय येवु नये म्हणुन त्यांचा फोन आल्यावरच सापळा कारवाई करण्याचे आम्ही ठरविले. परंतु लोकसेवक गियार यांचा सायंकाळी 17.45 पर्यंत फोन न आल्याने आम्ही तक्रारदार यंाना फोन करण्यास सांगीतले. तक्रारदार यांनी फोन केला असता लोकसेवक गियार यांचा संपर्क होवु न शकल्याने सदरची कारवाई दिनांक 12/12/2025 रोजी करण्याचे आम्ही ठरविले.

दिनांक 12/12/2025 रोजी संपुर्ण सापळा पथक सकाळी 10.00 वा कार्यालयात हजर झाले. त्यावेळी तक्रारदार नाझीरकर यांनी दोन्ही पंचासमक्ष सांगीतले की, रात्री मला लोकसेवक गियार यांनी फोन करुन आज रोजी सकाळी 11.30 वा हडपसर येथील नोबेल हॉस्पीटल जवळ भेटण्यास बोलविले आहे. त्यामुळे सापळा कारवाई नोबेल हॉस्पीटल जवळ करण्याचे आम्ही ठरविले. सापळा कारवाईकामी शासकीय वाहन क्रं एमएच 12 आरवाय 7271 व त्यावरील चालक पोहवा 4153 दिपक दिवेकर यांना सापळा पथकात सामील करुन घेण्यात आले. दिनांक 10/12/2025 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक गियार यांनी पंच क्रं 1 कोळी यांचेबाबत विचारणा केली असल्याने लोकसेवक गियार यांना पंच क्रं 01 कोळी यांचेवर संशय येण्याची शक्यता असल्याने आज रोजीच्या कारवाईमध्ये पंच क्रं 01 म्हणुन श्री. पंुडलिक ज्ञानदेव सांगळे व पंच क्रं 02 म्हणुन श्री. प्रताप शालीग्राम कोळी, हे काम पाहतील असे आम्ही ठरविले. पोशि दिवेकर यांच्या ताब्यात कॅमेरा देऊन सापळा कारवाईच्या निवेदणाचे

व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबत त्यांना सुचना दिली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये प्रथम तक्रारदार श्री दिपक बाळासो नाझीरकर व पंच क्रं 01 सांगळे व पंच क्रं 02 कोळी यांचे सापळा कारवाई करीताचे निवेदन व्हिडीओ चित्रीकरण करुन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 10.52 वा. ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर मपोहवा साका यंानी सुरक्षीत ठेवलेली लाच रक्कम काढुन त्यास पुन्हा अॅन्थ्रासिन पावडर लावुन पंचांची व तक्रारदार यांची खात्री करुन देवुन तक्रादार यांचे दुचाकी होंडा युनीकॉर्न वाहन क्रं एमएच 42 एजे 9204 चे डिक्कीमध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर मपोहवा साका यांना सदर कारवाई मधुन वगळण्यात आले.
त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 असे दुचाकीने व संपुर्ण सापळा पथक 11.05 वाजेच्या सुमारास कार्यालयातुन नोबेल हॉस्पीटलच्या दिशेने रवाना झालो. रामटेकडी पेट्रोलपंपाजवळ आम्ही आमचे शासकीय वाहन थांबुन तक्रारदार यंांना शासकीय वाहनात बसुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन ते त्यांचे शर्टच्या आत लावुन त्यांना पंचासह 11.29 वा त्यांचे दुचाकीवरुन रवाना केले. शासकीय वाहन नोबल हॉस्पीटलच्या पार्कीगसमोरील सार्वजनीक रोडवर पार्क करुन चालक सोडून सर्व वाहनातुन उतरून पायी चालत नोबल हॉस्पीटल पार्कीग परिसरामध्ये कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबुन राहिलो. त्यानंतर सदर ठिकाणी तक्रारदार व पंच दुचाकी वाहनावरुन आले. थोडयावेळ थांबुन तक्रारदार हे कोणताही इशारा न करता त्यांचे दुचाकी वाहनावरुन पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन ठरल्याप्रमाणे पुणे-सोलापुर रोडवरील चुल मटण हॉटेलच्या पार्कीगमध्ये आले. आम्हीही शासकीय वाहनाच्या तक्रारदार यांचे मागोमाग सदर ठिकाणी आलो. आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. ती वेळ 12.11 वा ची होती. आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता, आम्ही तक्रारदार यांना विचारले असता लोकसेवक गियार यांनी फोन करुन तक्रारदार यांना पुणे-सोलापुर रोड पंधरा नंबर, हडपसर येथे बोलविल्याचे तक्रारदार यांना सांगीतले. आम्ही तात्काळ पंधरा नंबर हडपसर येथे सापळा कारवाईचे आयोजन करण्याबाबत निर्णय घेतला. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच क्रं 1 यांना त्यांचे दुचाकी वाहनावरुन रविदर्शन चौकाचा सिग्नल ओलांडुन पुढील बाजुस सिरम कंपनीकडे जाणा-या रोडच्या कडेला जावुन थांबण्याची सुचना दिली. व सर्व पथक, व पंच क्रं 2 शासकीय वाहनाने सिरम कंपनीकडे जाणा-या रोडकडे रवाना झालो. शासकीय वाहनापाठोपाठ तक्रारदार व पंच क्रं 1 सदर ठिकाणी आल्यानंतर आम्ही तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसवुन व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतमधील बनियनला 12.23 वा. लावला व त्यांना पंधरा नंबर हडपसर येथे रवाना केले. सापळा कारवाईकरीता पंधरा नंबर येथुन मांजरीकडे जाणा-या रोडवरील कांगोकर टेलर या दुकानासमोर जावुन थांबणेबाबत तक्रारदार व पंच क्रं 1 यांना आम्ही सुचना दिली. तसेच लोकसेवक गियार हे न आल्यास पुणे सोलापुर रोडवरील कुमार मिडॉजच्या मोची शोरुमसमोरील पार्कीग येथे जावुन थांबणेबाबत सुचना दिली. त्यानंतर आम्ही सापळा पथक शासकीय वाहन पंधरा नंबर हडपसर येथे पोहचलो व येथील सार्वजनीक रोडवर पार्क करुन चालक सोडून सर्व वाहनातुन उतरून पायी चालत पंधरा नंबर हडपसर येथुन मांजरीकडे जाणा-या रोडवरील कांगोकर टेलरच्या दुकानासमोर कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबुन राहिलो. त्यानंतर सदर ठिकाणी तक्रारदार व पंच दुचाकी वाहनावरुन येवुन थंाबले. थोडावेळ थांबल्यानंतर तक्रारदार हे कोणताही इशारा न करता त्यांचे दुचाकी वाहनावरुन पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन सदर ठिकाणाहुन निघाले. त्यानंतर संपुर्ण पथक व पंच सदर ठिकाणाहुन निघुन शासकीय वाहनात बसले व तक्रारदार यांचे पाठोपाठ निघाले. त्यावेळी तक्रारदार व पंच क्रं 1 हे पंधरा नंबर सिग्नलवरुन डावीकडे वळुन तेथील वैशाली हॉटेलमध्ये जावुन बसले. त्याप्रमाणे शासकीय वाहन वैशाली हॉटेलच्या अलीकडे पार्क करुन संपुर्ण पथक वैशाली हॉटेलमध्ये कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबले. बराचवेळ थांबल्यानंतर तक्रारदार हे कोणताही इशारा न करता त्यांचे दुचाकी वाहनावरुन पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन सदर ठिकाणाहुन ठरल्याप्रमाणे पुणे-सोलापुर रोडवरील कुमार मिडॉज येथील मोची शोरुमच्या पार्कीगमध्ये आले. आम्ही सापळा पथक त्यांचे मागोमाग सदर ठिकाणी आलो व तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. ती वेळ 13.34 वा ची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता, तक्रारदार यांनी आम्हा दोन्ही पंचांसमक्ष सांगीतले की, मी व पंच क्रं 1 सांगळे असे माझ्या दुचाकी वाहनावरुन पंधरा नंबर चौक येथुन मांजरीकडे जाणा-या रोडवरील कांगोकर टेलरसमोरील सार्वजनीक रोडवर गेलो. सदर ठिकाणाहुन मी माझ्या मोबाईलवरुन लोकसेवक गियार यांना फोन केला असता मी त्यांना "ईथ पंधरा नंबरला मांजरीच्या फाटयाला येऊन थांबलो" असे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक गियार हे मला "ऑन द वे आहे, आलो 10 मीनीटात पोहोचतो" असे म्हणाले व फोन कट केला. त्यानंतर मी काहीवेळ त्यांची वाट पाहिली परंतु ते आले नाहीत. काहीवेळात मला लोकसेवक गियार यांनी फोन केला. त्यावेळी त्यांनी मला पुणे सोलापुर रोडवरील गंधर्व हॉटेलसमोर बोलावीले. त्यामुळे मी पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन गंधर्व हॉटेल शेजारील असलेल्या वैशाली हॉटेलमध्ये जावुन बसलो. त्यानंतर मी लोकसेवक गियार यांची बराच वेळ वाट पाहिली परंतु ते न

आलेने मी त्यांना फोन कॉल केला परंतु त्यांनी माझा कॉल रिसीव्ह केला नाही. त्यानंतर पुन्हा मी त्यांची बराचवेळ वाट पाहत सदर ठिकाणी थांबुन राहिलो. परंतु ते न आलेने मी सदर ठिकाणाहुन निघुन पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन माझ्या दुचाकी वाहनावरुन ठरलेप्रमाणे कुमार मिडॉज येथील मोची शोरुमच्या पार्कीगमध्ये आलो. अशी हकिकत आम्हा दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली.

एकंदरीत लोकसेवक गियार यांना संशय आल्याने आम्ही सापळा पथक मोची शोरुमच्या पार्कीगमध्ये लोकसेवक गियार यांचे फोन येण्याची वाट पहात थांबुन राहीलो. बराचवेळ वाट पाहील्यानतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक गियार यांना फोन करण्यास सांगीतले. तक्रारदार यांनी गियार यंाना फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही. आम्ही सापळा पथक मोची शोरुमच्या पार्कीगमध्ये बराचवेळ थांबुन लोकसेवक गियार यांच्या फोनची वाट पहात थांबलो परंतु त्यांचो फोन न आल्याने आम्ही संपुर्ण सापळा पथक 16.20 वा कार्यालयात परत आलो. व त्यानंतर लोकसेवक गियार यांचा फोन आल्यावरच सापळा कारवाई करण्याचे आम्ही ठरविले. सदरचे मेमरी कार्ड सिलबंद करण्यात येवुन सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 23/12/2025 रोजी तक्रारदार नाझीरकर यांनी आम्हाला फोन करुन संागीतले की, माझे ओळखीचे अमित धंगेकर हे माझ्या कामाकरीता लोकसेवक भगवान पवार यांना भेटले असता त्यांनी मला दिनांक 29/12/2025 रोजी भेटण्यास बोलाविले आहे. त्यामुळे दिनांक 29/12/2025 रोजी लोकसेवक भगवान पवार हे लाच रकमेबाबत चर्चा करु शकता असे तक्रारदार यांनी सांगीतल्याने सदर दिवशी पडताळणी कारवाई करण्याची तक्रारदार यांनी विनंती केली. त्याअनुशंगाने दिनांक 29/12/2025 रोजी संपुर्ण सापळा पथकास सकाळी 10.00 वा लाप्रवि कार्यालयात हजर राहणेबाबत आम्ही सुचना दिली.

दिनांक 29/12/2025 रोजी सकाळी संपुर्ण सापळा पथक हे सकाळी 10.00 वा लाप्रवि कार्यालयात हजर झाले. सदरच्या दिवशी पडताळणी कारवाई करीता नविन मेमरी कार्ड वापरण्याचे आम्ही ठरविले. नविन मायक्रो एस.डी.कार्डचे सिलबंद पॅकिंग उघडुन पंचांना दाखविले असता ते सॅनडिस्क कंपनीचे 8 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी. कार्ड असून त्याचे पुढील बाजुस च्ड्ढदक्त्भ्त्त् 8 क्रए ग्त्ड्ढदृ च्क् त्तक् क्ष् 4217 क्च्र्ख्च्60क्7 एक्ष् ग्त्रक्क क्ष्ग् क्तक्ष्ग्त्र असे असल्याचे दिसून आले.सदरचे नविन मेमरी कार्ड तक्रारदार व पंच यांना दाखवुन त्यामध्ये प्रथम तक्रारदार व पंच 01 म्हणुन श्री.पुंडलीक सांगळे व पंच क्रं 02 म्हणुन प्रताप कोळी यांचे निवेदन 14.48 वा. रेकॉर्ड केले व तक्रारदार व पंच यांना सुचना देवुन 15.03 वा रेर्कार्डर चालु करुन तक्रादार व पंच सांगळे यांना तक्रारदार यांचे दुचाकी क्रं एमएच 42 एझेड 9204 वरुन रवाना केले. काहीवेळात तक्रारदार व पंच क्रं 1 सांगळे हे आमचे लाप्रवि, पुणे कार्यालयात 16.43 वा परत आले. आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला व तक्रारदार यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगीतले की, मी व पंच सांगळे माझ्या दुचाकी वाहनावरुन आरोग्य विभाग उपसंचालक कार्यालय मध्ये गेलो. व लोकसेवक भगवान पवार यांचे केबीनच्या बाहेर बसुन राहिलो. काहीवेळाने मी लोकसेवक भगवान पवार यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी लोकसेवक भगवान पवार हे माझ्याकडे बघुन "हं" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना "बोलवल होत तुम्ही भेटायला" असे म्हणालो असता ते मला "अं.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "अमितनी सांगीतल होत, सरांनी बोलवलय म्हणुन" असे म्हणालो त्यावर लोकसेवक भगवान पवार मला "ठिकए, जावा तुम्हाला ऑर्डर काढलीए जॉईन व्हा" असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांचे केबीनमधुन बाहेर येऊन पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन माझे दुचाकी वाहनावरुन लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आलो. अशी हकिकत पंचांसमक्ष सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन एैकले असता ते तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी सांगीतलेली हकीकतप्रमाणे खरे असल्याची खात्री केली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर तक्रारदार यांनी उपसंचालक कार्यालयात जावुन त्यांचे ऑर्डरची खात्री केली असता त्यांची प्रा.आ.केंद्र, केंदुर,उपकेंद्र पाबळ ता.शिरुर जि.पुणे याठिकाणी झाल्याचे त्यांना समजले. त्याबाबत तक्रारदार यांनी लोकसेवक गियार यांना पाबळ ऑर्डर झालेबाबत फोन करुन सांगीतले असता लोकसेवक गियार यांनी साहेबांशी बोलुन सांगतो असे सांगीतले.

दिनांक 30/12/2025 रोजी साधारण सायंकाळी 18.30 वा चे सुमारास लोकसेवक गियार यांनी तक्रारदार ं यांना फोनकरुन दिनांक 31/12/2025 रोजी दुपारी 12.00 वा चे सुमारास औंध येथे लाच रक्कम घेऊन बोलावीले आहे." असे आम्हास फोन करुन सांगीतले. त्यावरुन आम्ही दिनांक 31/12/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेतला. सर्व पथक हे दिनांक 31/12/2025 रोजी सकाळी 10.00 वा लाप्रवि कार्यालयात हजर झाले सापळा पथकामध्ये मपोशि सुप्रीया मानकर यांना सामील करुन शासकीय वाहनाने आम्ही संपुर्ण सापळा पथक औंध येथे 11.00 वा रवाना झालो. सांगवी फाटा येथे गेल्यानंतर 11.56 वा तक्रारदार व दोन्ही पंचाचे निवेदन घेण्यात आले सदरबाबत व्हिडीओ रेकॉर्डीग करण्यात आलेले आहे. त्यानंतर आमचे सुचनेवरुन

तक्रारदार यांना त्यांचा मो.क्रं. 9284332596 यावरुन लोकसेवक गियार यांचा मो.क्रं. 9881719393 यावर फोन करण्यास सांगीतले असता त्यांनी मयतीला आहे असा मॅसेज केला. आम्ही सापळा पथक त्याठिकाणी थांबुन राहीलो. थोडावेळाने पुन्हा तक्रारदार यांनी लोकसेवक गियार फोन केला असता गियार यांनी आमचे मेडीकल ऑफिसर रात्री एक्स्पायर झाले त्यांचे मयतीला आहे, इकडे वाघोलीला" असे सांगुन अध्र्या तासात फ्रि झालो की कॉल करतो असे सांगीतले. व त्यानंतर फोन कट केला. साधारण एक तास थांबुनही लोकसेवक गियार यांनी फोन न केल्याने संपुर्ण सापळा पथक लाप्रवि कार्यालयात आले. परंतु लोकसेवक यांनी सायंकाळ पर्यत फोन न केल्याने सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली. रात्री 09.00 वाजेचे सुमारास लोकसेवक गियार यांनी तक्रारदार यांना फोन करुन "माझे भगवान पवार साहेबांशी बोलणे झाले आहे, त्यांनी ऑर्डरमध्ये अंशत: बदल करुन तुमची बावडा येथे नियुक्ती आदेश करणार असल्याचे सांगीतले व दिनांक 02/01/2026 रोजी सकाळी जिल्हा परिषद येथे भेटु असे आम्हाला फोन करुन सांगीतले व सदरचा फोन कॉल मी माझे मोबाईल फोन मध्ये रेकॉर्ड केल्याचे आम्हाला फोन करुन सांगीतले. म्हणुन आम्ही दिनांक 02/01/2026 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविले.

आज दि. 02/01/2026 रोजी सकाळी 10.45 वा. चे सुमारास तक्रारदार नाझिरकर हे लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर झाले. त्यावेळी दोन्ही पंच हजर झाले. तक्रारदार नाझीरकर यांनी दिनांक 31/12/2025 रोजी लोकसेवक गियार यांनी केलेल्या फोनबाबत पंचांसमक्ष सांगीतले की, डॉ. भगवान पवार हे माझे ऑर्डरमध्ये अशत: बदल करणार असुन मला आज रोजी लाच रक्कम घेऊन पुणे जिल्हा परिषद येथे बोलावीले आहे." असे सांगीतले. म्हणुन आजरोजी सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेतल्याचे आम्ही पंचांना सांगीतले.. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये प्रथम तक्रारदार श्री दिपक बाळासो नाझीरकर यांनी त्यांचे निवेदन व त्यानंतर पंच क्रं 01 म्हणुन श्री. पंडुलिक ज्ञानदेव सांगळे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. प्रताप शालीग्राम कोळी यांचे सापळा कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 11.24 वा. ध्वनीमुद्रीत केले सदरबाबत व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आलेले आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक गियार हे कुठे आहे याबाबत खात्री करणेकरीता आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 9284332596 यावरुन लोकसेवक गियार यांचा मो.क्रं. 9881719393 यावर फोन केला असता लोकसेवक गियार "हे काय औंधवरुन निघतोय आता, एक तासभरात झेडीपीला या" असे म्हणाले. त्यानंतर आम्ही मपोहवा साका यांना तात्पुरते सापळा पथकात सामील करुन घेतले व खाकी पाकिटामध्ये सुरक्षीतरित्या ठेवलेली लाच रक्कम पंचांसमक्ष हजर केली. दरम्यानची सदरची रक्कम तिच असल्याची आम्ही पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर मपोहवा/साका यांनी पुन्हा तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या 160 भारतीय चलनी नोटा, 500 रुपये दराच्या खेळण्यातील बनावट नोटांना आमचे सुचनेवरुन मपोहवा/साका यांनी 500/-रु. दराच्या 160 भारतीय चलनी नोटा, बनावट नोटा, वर्तमानपत्रास व आकाशी रंगाची पिशवी एका कागदावर ठेवून त्या नोटांच्या दोंन्ही बाजुस, वर्तमानपत्राच्या दोन्ही बाजुस व पिशवीच्या बंदाला व दोन्ही बाजुस कापसाच्या बोळ्याने क्रमा-क्रमाने अँथ्रासिन पावडर लावली. व सदरची लाच रक्कम आकाशी रंगाच्या पिशवीमध्ये ठेवुन तक्रारदार श्री. दिपक नाझीरकर यांच्या निळया रंगाच्या सॅकमध्ये ठेवली. त्यानंतर मपोहवा/साका यांना ठरल्याप्रमाणे पथकातुन वगळण्यात आले. आम्ही सापळा पथकास सुचना देत असतांनाच लोकसेवक गियार यांचा फोन आला व लोकसेवक गियार हे तक्रारदार यांना "कुठ थांबलेत" अशी विचारणा केली. त्यावर तक्रारदार हे लोकसेवक गियार यांना "मी जरा जहांगीरला आलो आहे, आजोबांना आणलय" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक गियार हे तक्रारदार यांना "तुमच झाल की, करा मग कॉल, मी आहे ईथच" असे म्हणाले व फोन कॉल कट केला. सदरचा फोन रेकॉर्डवर घेण्यात आलेला आहे.

त्यानंतर आम्ही सापळा पथकास योग्य त्या सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तो तक्रारदार यांच्या शर्टच्या आत बनियनला चालु करुन 14.25 वा तक्रारदार व पंच क्रं 01 सांगळे यांना तक्रादार यांचे दुचाकी होंडा युनीकॉर्न वाहन क्रं एमएच 42 एजे 9204 यावरुन रवाना केले व सापळा पथक व पंच क्रं 02 हे सापळा कारवाईकरीता लाप्रवि, पुणे कार्यालातुन शासकीय वाहन क्रं एमएच 12 युसी 4109 यामधुन व पोशि ठाकुर व पोशि आडके हे पोशि आडके यांचे दुचाकी वाहनावरुन लाप्रवि, पुणे कार्यालयातुन रवाना झाले. शासकीय वाहन इराणी हॉटेल समोर पार्क करुन चालक सोडून सर्व वाहनातुन उतरुन पायी चालत पुणे जिल्हा परिषद परिसरामध्ये कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबुन राहिलो. त्यानंतर सदर ठिकाणी तक्रारदार व पंच दुचाकी वाहनावरुन आले व त्यांचेमागोमाग पोशि आडके व पोशि ठाकुर हे त्यांचे दुचाकी वाहनावरुन सदर ठिकाणी येऊन कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबले.. त्यानंतर काहीवेळाने एका दुचाकी वाहनावरुन तक्रारदार यांचेजवळ लोकसेवक राककिशन गियार हे आले व तक्रारदार यांचेसोबत चर्चा केली. त्यानंतर लोकसेवक गियार पुढे असलेल्या एका चहाच्या टपरीजवळ जावुन थांबले. त्यांचेमागोमाग तक्रारदार व पंच सांगळे त्या चहाच्या टपरीजवळ

गेले. लोकसेवक गियार यांना संशय येवु म्हणुन पंच 01 सांगळे हे थोडया अंतरावर थांबुन राहीले. सदर ठिकाणी तक्रारदार व गियार यांनी चहा घेतला व तक्रारदार हे गियार यांच्या दुचाकी वाहनावरुन निघाले. त्यावेळी पोशि आडके व पोशि ठाकुर हे त्यांचे दुचाकी वाहनावरुन गेले. सर्व पथक व पंच यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे सर्वजण शासकीय वाहनामध्ये बसले. त्यानंतर आम्ही पोहवा दिवेकर यांना तक्रारदार यांच्या वाहनाच्या मागोमाग शासकीय वाहन घेण्यास सांगीतले. तक्रारदार व लोकसेवक गियार हे त्यांचे दुचाकी वाहनावरुन पोलीस कमीशनर ऑफिस सिग्नलवरुन डावीकडे वळुन, लाल देऊळ चौकातुन पुन्हा डावीकडे वळुन, जिल्हा परिषद पुणे कार्यालयासमोर येऊन थांबले. त्यावेळी पोशि आडके व पोशि ठाकुर त्यांचे मागोमाग काहीअंतरावर जावुन थांबले. तसेच शासकीय वाहनामधुन संपुर्ण पथक व दोन्ही पंच त्यांचेमागोमाग गेले. त्यावेळी पंच क्रं 1 सांगळे हे तक्रारदार व लोकसेवक गियार हे थांबले त्याठिकाणी जाऊन थंाबले. त्यावेळी त्यांचेमध्ये चर्चा सुरु असताना तक्रारदार यांनी त्यांचे बॅगमधील लाच रकमेचे पाकिट काढुन लोकसेवक गियार यांचे समोर धरले असता ते पाकीट लोकसेवक गियार यांनी त्यांचे हातात घेवुन त्यांचेे दुचाकी वाहनाच्या डिक्कीमध्ये ठेवले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे अंगातीन जॅकेट काढुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोशि ठाकुर यांनी लगेच तक्रारदार नाझीरकर यांचे ताब्यातील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 15.15 वा ची होती. त्यावेळी संपुर्ण पथक लाच रक्कम स्विकारलेल्या ठिकाणी जिल्हा परिषद कार्यालयासमोरील सार्वजनीक रोडवर आले. त्यानंतर आम्ही पंचांसमक्ष तक्रारदार श्री. नाझीरकर यांना लाच रक्कम कोणी स्वीकारली अशी विचारणा करता तक्रारदार यांनी सदर ठिकाणी बाजुला उभ्या असलेल्या इसमाकडे बोटाने इशारा केला व तेच लोकसेवक गियार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना बाजुला थांबण्याबाबत सुचना दिली. त्यावेळी पोशि ठाकुर यांनी लोकसेवकाचे डावा हात व पोलीस शिवाई आडके यांनी उजवा हात मनगटाजवळ घट्ट पकडून त्यांना ताब्यात घेतले ती वेळ 15.16 वा ची होती. त्यावेळी मपोशि मानकर यांनी त्यांचेकडील व्हीडीओ शुटींग करीता दिलेला कॅमेरामध्ये व्हीडीओ शुटींग चालु करून चित्रिकरण चालु केले. आम्ही लोकसेवक गियार यांना स्वत:ची ओळख सांगुन त्यांचेविरुध्द झालेल्या सापळा कारवाईची माहिती दिली व त्यांचा पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. रामकिशन गंगाराम घ्यार, वय - 43, पद - आरोग्यसेवक, जिल्हा परिषद, पुणे, रा. क्वार्टर नं 1, प्राथमीक आरोग्य केंद्र, वाघोली, पुणे असे सांगितले. परंतु यातील तक्रारदार यांनी तक्रार देतांना रामकिशन घ्यार यांचे नाव आडनाव नक्की माहीत नसल्याने त्यांचे नाव रामकिशन गियार असे सांगीतले होते. त्यानंतर आम्ही लोकसेवक घ्यार यांना तक्रारदार नाझीरकर यांचेकडून स्वीकारलेली लाच रक्कम कोठे ठेवली अशी विचारणा करता लोकसेवक घ्यार यांनी त्यांचे दुचाकी वाहनाच्या डिक्कीमध्ये लाच रक्कम ठेवली असल्याचे सांगीतले. आमचे सुचनेवरुन पंच क्र.2 कोळी यांनी सदर लाच रक्कम त्यांचे ताब्यात घेतली व त्यांचेकडील नोटांचा नंबर लिहलेला कागद बाहेर काढून त्यावरील लिहीलेले नंबर व नोटांवरील नंबर यांची पाहणी केली असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर लोकसेवक घ्यार यांना व पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना शासकीय वाहनात बसवुन कृत्रिम अंधार केला व लोकसेवक घ्यार यांना आमचे स्वत:चे व सापळा पथकातील अंमलदार व पंच क्र.1 यांचे हात व कपडे अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात दाखवून कोणाचेही हातास अगर कपडयास अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी नसल्याची खात्री करून दिली. त्यानंतर शासकीय वाहनात उजेड करण्यात आला.

त्यानंतर आम्ही शासकीय वाहनामध्ये कृत्रीम अंधार करुन लोकसेवक घ्यार यांच्या हाताची व त्यांचे कपडयाची व पंच क्र.02 यांचे ताब्यातील हस्तगत लाच रक्कम अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाशात तपासणी केली असता हस्तगत लाच रकमेवर तसेच लोकसेवक घ्यार यांच्या उजव्या हातास अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसवुन त्यांचे हाताची तपाणी केली असता, त्यांच्या उजव्या हाताच्या बोटांच्या पे-यास व त्यांच्या बॅगच्या आतील बाजुस अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर शायकीय वाहनात उजेड करण्यात आला. त्यानंतर आम्ही पंचांसमक्ष लोकसेवक गियार यांच्या दुचाकी वाहनाची पाहणी केली असता त्यांच्या होंडा शाईन दुचाकी वाहन क्र एमएच 12 एमसी 3117 च्या डिक्कीची कृत्रीम अंधार करुन अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता, वाहनाच्या डिक्कीच्या आतील बाजुस निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर लोेकसेवक रामकिशन घ्यार यांना घेवुन संपुर्ण सापळा पथक लाप्रवि पुणे कार्यालयात आले.

त्यानंतर लोकसेवक भगवान पवार, उपसंचालक, आरोग्य विभाग, पुणे यांचेकडे लोकसेवक रामकिशन घ्यार यांनी लाच रक्कम स्विकारली असुन डॉ. भगवान पवार यांचेकडे त्यांचे संमतीची खात्री करणेसाठी लोकसेवक भगवान पवार यांना फोन कॉल करणेबाबत लोकसेवक रामकिशन घ्यार यांना सांगीतले व त्यास लोकसेवक रामकिशन घ्यार यांनी संमती दिली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन आलोसे घ्यार यांनी त्यांचा मो.क्रं. 9881719393 यावरुन लोकसेवक भगवान पवार यांचा मो.क्रं. 8888611199 यावर फोन करुन स्पिकर ऑन केला, त्यावेळी आम्ही

त्यांचेकडील व्हॉइस रेकॉर्डर सुरु केला त्यावेळी आलोसे गियार हे लोकसेवक पवार यांना “सर त्या नाझीरकरच्या बदलीचे 03 लाख रुपये आले होते माझ्याकडे, काय करु?” अशी विचारणा केली त्यावर लोकसेवक भगवान पवार हे तक्रारदार यांना “अजिबात घेऊ नकोस, मुर्खासारख कायपण बोलतोस का रे तु” असे म्हणुन त्यांनी फोन कट केला. सदरचा कॉल रेकॉर्डवर घेण्यात आलेला आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी व पंच क्र 1 सांगळे असे माझे दुचाकी जिल्हा परिषद कार्यालयासमोरील सार्वजनीक रोडवर गेलो. सदर ठिकाणी जाऊन मी माझे मोबाईलवरुन घ्यार साहेब यांना फोन करुन माझ्या मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी घ्यार साहेब यांनी माझा फोन कॉल रिसीव्ह करुन मला “हा...हा बोला नाझीरकर” असे म्हणाले त्यावर मी त्यांना “हा...आलोय की मी झेड पी च्या बाहेर” असे म्हणालो असता ते मला “बरं...आलो ए पाच मिनिटात इथंच झेड पी ला आलोच” असे म्हणुन त्यांनी फोन कट केला. त्यानंतर मी व पंच क्रं 1 सांगळे त्यांची वाट बघत सदर ठिकाणी थांबुन राहिलो. बराच वेळ ते न आलेने मी परत त्यांना माझ्या मोबाईलवरुन कॉल करुन स्पिकर ऑन केला त्यावेळी मी त्यांना “हा...बोला...की कुठयेत” असे म्हणालो त्यावर ते मला “हे काय गेटवर आलोय... मी तुम्हालाच कॉल करत होतो” असे म्हणाले त्यावेळी ते त्यांचे दुचाकीवरुन माझे समोर आले. त्यानंतर मी, पंच सांगळे व आलोसे घ्यार असे तेथेच बाजुला असलेल्या टपरीवर चहा पिण्यासाठी गेलो. त्यावेळी माझ्यामध्ये आलोसे गियार यांचेमध्ये माझे कामासंदर्भात चर्चा सुरु असताना मी त्यांना “3 लाख रुपये आणि राहिलेलं.... तुम्हाला म्हटलं ना मी करतो मी .....पगार वैगेरे झाल्यावर....पगार किती दिवसांत निघलं काय” असे म्हणालो असता ते मला “विचारायंला लागलं.... मी ऑर्डर घ्यायच्या नादाता होतो....पहिली तुम्ही जॉईन हयाच्या नादात होतो...पहिलं तुम्ही जॉईन व्हा...सगळंच काम एकदा सांगितलं की मग खिचडी होती” असे म्हणाले त्यावर मी त्यांना “पण कसं भगवान सरांना बोला हा विषय.... त्यांना कळु दी ही पगाराचं” असे बोललो असता ते मला “हं” असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा आमचेमध्ये काहीवेळ चर्चा झाली. चहा पिऊन झाल्यानंतर आलोसे घ्यार हे त्यांचे दुचाकीजवळ गेले त्यावेळी मी व पंच त्यांचेजवळ गेलो असता आलोसे घ्यार यांनी मला इशा-याने लाच रक्कम त्यांचे दुचाकी वाहनाच्या डिक्कीमध्ये ठेवणेबाबत सांगीतले. त्याचवेळी मी लाच रक्कम बॅगेमधुन काढत असताना घ्यार यांनी मला इशा-यानेच त्यांचे दुचाकी वाहनावर बसण्यास सांगीतल्याने मी त्यांचे दुचाकी वाहनावर बसलो. त्यावेळी त्यांनी त्यांची दुचाकी पोलीस कमीशनर ऑफिस सिग्नल वरुन डावीकडे वळवुन, लाल देऊळ सिग्नलवरुन पुन्हा डावीकडे वळवुन जिल्हा परिषद कार्यालयासमोरील सार्वजनीक रोडवर थांबवली व मला लोकसेवक घ्यार यांनी हाताने इशारा करत लाच रक्कम त्यांचे दुचाकीच्या डिक्कीमध्ये ठेवण्यास सांगीतली त्यावेळी मी माझ्या बॅगेतील लाच रकमेचे पाकिट माझ्या उजव्या हाताने काढुन त्यांचेसमोर धरले असता, त्यांनी ते पाकिट त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे दुचाकी वाहनाच्या डिक्कीमध्ये ठेवले. त्यावेळी मी सापळा पथकास माझ्या अंगातील जर्कीन काढुन लाच रक्कम स्विकारलेचे पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पथकाने येऊन त्यांना ताब्यात घेतले. अशी हकिकत तक्रारदार यांनी आम्हास दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली. त्यानंतर आम्ही पंच क्रं 01 यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहीती विचारली असता त्यांनीही तक्रारदार यांनी सांगीतलेल्या हकीकते प्रमाणेच हकीकत सांगीतली त्यांनंतर आम्ही दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ए ैकले असता ते तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी सांगीतलेली हकीकतप्रमाणे खरे असल्याची खात्री केली. सदरचे मेमरी कार्ड सिल करण्यात येवुन सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दिनांक 02/12/2025 रोजी तक्रारदार श्री. दिपक बाळासो नाझीरकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 04/12/2025 व दि. 05/12/2025 रोजीच्या झालेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक रामकिशन गंगाराम घ्यार यांनी तक्रारदार यांना प्राथमिक आरोग्य केंद्र बावडा ता. इंदापुर जि. पुणे येथे डॉ. भगवान पवार, उपसंचालक, आरोग्य विभाग पुणे यांचेकडुन सुरवातीस नियुक्ती आदेश करुन देण्याकरीता व नंतर केलेल्या आदेशामध्ये अशत: बदल करुन देणेकरीता डॉ.भगवान पवार यांचेकरीता तिन लाख रुपयांची मागणी करुन दिनांक 02/01/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई मध्ये जिल्हा परिषद पुणे समोरील सार्वजनीक रोडवर तक्ररदार श्री. दिपक बाळासो नाझीरकर यांचेकडुन तिन लाख रुपयांची लाच रक्कम स्विकारली म्हण ुन माझी श्री. रामकिशन गंगाराम घ्यार, आरोग्य सेवक, जिल्हा परिषद पुणे यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7(अ), प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Santosh Laxman Pandhre(I (Inspector)) / DGPSLPM7301 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा): 13/01/26

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

एस.एच.ओ./ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Santosh Laxman Pa

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): DGPSLPM7301